दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक १६१ वा शनिवार दि.०७ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## हजारो आंबेडकरी अनुयायांच्या उपस्थितीत डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी महाबुद्ध वंदना...






लातूर / प्रतिनिधी :- प्रज्ञासूर्य, उपेक्षितांचे नायक, महामानव, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त समस्त लातूरकरांच्यावतीने पु. भंतेजी पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महा बुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुखाणू समितीतर्फे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पूजनीय भिक्खु संघाच्यावतीने त्रिरत्न वंदना घेण्यात आली. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौद्ध धम्माची आचारसंहिता म्हणजे बावीस प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचण्यात आली. या प्रसंगी पुढे बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले कि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते एका सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला, समाजातील शेवटच्या माणसाला न्याय मिळवून दिला, आणि शिक्षण हे समाजाच्या उद्धाराचे साधन आहे हे शिकवले. बाबासाहेबांचे विचार आणि तत्वे आपण आपल्या जीवनात रुजवली, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक राष्ट्रगीताने झाला. यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो,भंते बुद्धशील, भंते बोधिराज, आर्या मेत्ता,या प्रसंगी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस. एन चिकुर्ते, एम. एन. बलांडे, बापू गायकवाड, सुरेश गायकवाड, एम. एन गायकवाड, केशव कांबळे, अनिल बनसोडे, भीमराव चौधंते, डॉ. सुधाकर गुळवे, पांडुरंग अंबुलगेकर, विठ्ठल जाधव,पृथ्वीराज शिरसाट, बसवंतप्पा उबाळे, डॉ. विजय अजनीकर,डॉ. अरुण कांबळे, चंद्रसेन भडके,प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. देवदत्त सावंत,प्रा. विश्वनाथ आल्टे,संजय सोनकांबळे ॲड. धम्मदीप बलांडे, राजूभाऊ सूर्यवंशी,डॉ. सदानंद कांबळे, बाबासाहेब गायकवाड, डी एस नरसिंगे,विनोद कोल्हे, विनय जाकते,उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, निलेश बनसोडे, प्रा. सतीश कांबळे, विशाल वाहुळे,रामराव गवळी,अशोक कांबळे, अंतेश्वर थोटे, पांडुरंग अंबुलगेकर, राहुल शाक्यमुनी, सरिता बनसोडे,सुशील चिकटे,शारदा लामतुरे, संगीता कांबळे ,सुजाता आजनिकर, शारदा घोबाळे, त्रिशाला घोडके तसेच महा बुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे सर्व सदस्य व मोठ्या संख्येने आंबेडकर अनुयायी उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त महार बटालियन व शाक्यसंघ माता भीमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्याद्वारे सलामी देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महा बुद्ध वंदना सुकानू समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या ही वर्षी पावसाचा व्यत्यय तरीही हजारो अनुयायी उपस्थित

दोन तास उभे राहूनच अभिवादन लहान बालकांची लक्षवेधी उपस्थितीकास्ट्राईब कर्मचारी बहुजन संघ तर्फे रक्तदान शिबीर, रक्तदात्यांची लक्षणीय संख्या.


## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज शुक्रवार दिनांक ६ डिसेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन रवींद्र काळे धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अश्लेष मोरे सुभाष घोडके विश्वास शेम्बेकर धनंजय कुलकर्णी स्वप्निल देशमुख शिवम मिटकरी आदित्य कुलकर्णी सुमुख गोविंदपुरकर प्रथमेश जाधव शिवशंकर पटवारी आसिफ बागवान अहमदखा पठाण इसरार पठाण जहीर शेख अनिल चव्हाण सिकंदर पटेल दगडूआप्पा मिटकरी अब्दुल्ला शेख विष्णुदास धायगुडे राम कोंबडे इसरार सगरे सोनू डगवाले गोविंद देशमुख बळवंत पाटील रामदास पवार मनोज पाटील सचिन बंडापले चंद्रकांत मद्दे गोटू यादव गोरोबा लोखंडे मकबुल वलांडीकर हरिभाऊ गायकवाड भाऊसाहेब शेंद्रे सिराजुद्दीन जहागीरदार,सय्यद सरफराज,राम कोंबडे संजय ओव्हळ गोटू यादव आनंद वैरागे प्राध्यापक माधव गादेकर सुरज चव्हाण अंगद वाघमारे पत्रकार अशोक देडे कल्याण शाहीर नागनाथ डोंगरे युनूस शेख सत्तार शेख केशरबाई महापुरे डॉ. दिनेश नवगिरे अब्दुल्ला शेख निलेश देशमुख मनोज चिखले ॲड अंगद गायकवाड महेंद्र घोडके आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.



## पुष्पा २ चा पुष्पराज आहे भारतातील सर्वात महागडा अभिनेता, जाणून घ्या अल्लू अर्जुनने किती फी घेतली?

पुष्पा २: द रूल काल देशभरात प्रसिद्ध झाला आहे. अल्लू अर्जुन पुष्पा २ मध्ये अप्रतिम क्शन करताना दिसत आहे. पण अल्लू अर्जुनला या चित्रपटासाठी किती फी मिळाली हे तुम्हाला माहिती आहे का. कदाचित तुम्हाला माहीत नसेल. पण या चित्रपटासाठी अल्लू अर्जुनला आजपर्यंत कोणत्याही भारतीय स्टारला मिळालेल्या फीपेक्षा जास्त फी मिळाली आहे. सलमान खान, शाहरुख खान, आमिर खान आणि हृतिक रोशनसारखे स्टार्सही फीच्या बाबतीत अल्लू अर्जुनच्या जवळ राहत नाहीत. असो, पुष्पा २ चे पहिल्या दिवसाचे कलेक्शन अंदाजे १७० कोटी रुपये आहे, अशा परिस्थितीत निर्माते अल्लू अर्जुनची फी पहिल्या दिवसाच्या कलेक्शनमधूनच वसूल करू शकतात. पण असे अनेक स्टार्स आहेत जे फीसोबतच चित्रपटांचा नफाही वाटून घेण्यावर विश्वास ठेवतात. यामध्ये रजनीकांतचे नाव घेतले जाऊ शकते, ज्यांना जेलरमध्ये नफ्याच्या वाटा म्हणून १०० कोटी रुपयांचा चेक मिळाला होता. या चित्रपटासाठी त्यांची फी सुमारे ११० कोटी रुपये होती. अशा प्रकारे रजनीकांतला जेलरसाठी २१० कोटी रुपये फी मिळाली. अक्षय कुमारही नफ्याच्या वाटणीच्या जोरावर चित्रपटांमध्ये काम करतो. काही काळापूर्वी फोर्ब्सने भारतातील सर्वात महागड्या स्टार्सची फी जाहीर केली होती. फोर्ब्सच्याअहवालानुसार, भारतातील टॉप १० सर्वात महागडे कलाकार खालीलप्रमाणे आहेत: अल्लू अर्जुन 'पुष्पा'च्या यशानंतर अल्लू अर्जुनची लोकप्रियता गगनाला भिडली आहे. पुष्पा २ साठी त्याने ३०० कोटी रुपयांची मोठी रक्कम घेतली आहे. थलपती विजय तमिळ सिनेमाचा सुपरस्टार थलपथी विजयने साठी २०० कोटी रुपये आकारले. शाहरुख खान बॉलीवूडचा बादशाह शाहरुख खानचा शेवटचा रिलीज झालेला 'डंकी' होता ज्यासाठी त्याने १५०-२५० कोटी रुपये फी आकारली होती. रजनीकांत दक्षिण भारतीय सिनेसृष्टीतील सुपरस्टार रजनीकांतने 'वेट्टियाँ'साठी १२५ कोटी रुपये घेतले आहेत. आमिर खान 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खानचा शेवटचा रिलीज 'लाल सिंग चड्डा' होता ज्यासाठी त्याने १००-२७५ कोटी रुपये फी आकारली होती. कल्की बाहुबली फ्रँचायझीने प्रसिद्ध झालेल्या प्रभासने 'कल्की २८९८ एडी'साठी १००-२०० कोटी रुपये घेतले आहेत. अजित कुमार तामिळ चित्रपटसृष्टीतील आणखी एक सुपरस्टार अजित कुमारने 'थुनिवू'साठी १०५-१६५ कोटी रुपये फी घेतली आहे. सलमान खान बॉलिवूडचा भाईजान सलमान खानने 'टायगर ३'साठी १०० ते १५० कोटी रुपये घेतले आहेत. कमल हसन दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते कमल हसन यांनी इंडियन २ साठी १००-१५० कोटी रुपये आकारले होते. अक्षय कुमार बॉलिवूडचा खिलाडी कुमार अक्षय कुमारने खेल खेल में सिनेमासाठी ६०-१४५ कोटी रुपये फी घेतली आहे. आपल्या भागातील बातम्या जाणून घेण्यासाठी जॉइन करा आझाद मराठीचा'चा व्हॉट्सअॅप ग्रुप



## पानगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना धिरज देशमुख यांच्याकडून अभिवादन

## राज्याच्या वेगवेगळ्या भागातील हजारो अनुयायांची उपस्थिती






रेणापूर/ प्रतिनिधी :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर ग्रामीण मधील पानगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र अस्थींचे लातूर ग्रामीणचे माजी आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस श्री धिरज विलासराव देशमुख यांनी दर्शन घेऊन अभिवादन केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त पानगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या अस्थी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून राज्याच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या नागरिकांशी श्री धिरज विलासराव देशमुख यांनी संवाद साधला. यावेळी चंद्रचूड चव्हाण, सर्जेराव मोरे, प्रमोद जाधव, व्ही. के. आचार्य, सुरेश लहाने, विश्वासराव देशमुख, रमेश सूर्यवंशी, उषा कांबळे, प्रभाकर केंद्रे, अनंत लांडगे, मोहन माने, शिवाजी आचार्य, उत्तरेश्वर हलकुडे, विवेक चव्हाण, सिद्धेश्वर गालफाडे, उमर पठाण, अभिजीत चव्हाण, किरण हनवते, गणेश चव्हाण, गुलाब चव्हाण, रघुनाथ शिंदे, वैभव आचार्य, ललिता कांबळे, मीना मोटाडे, विश्वनाथ कागले, प्रकाश सूर्यवंशी, गोविंद जाधव, भैया आचार्य, हरी रामरूळे, जयदीप आचार्य, आर. के. आचार्य आदींसह आंबेडकरी विचाराचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, लातूरचे माजी पालकमंत्री तथा आमदार श्री अमित विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नांतून पानगाव येथील चैत्यस्मारक विकसित झाले. आम्हीही या पवित्र अस्थी स्थळाच्या विकासासाठी प्रयत्न केले. येणाऱ्या काळात सर्वांना सोबत घेऊन विकासासाठी कार्यरत राहू.

पानगाव परिसरातील या अस्थीस्थळाचे राज्यस्तरीय तीर्थस्थळ व्हावे, असा येथील जनतेचा मानस होता, त्याला अनुसरून येथे चैत्यस्मारक उभारण्यात आले. या स्मारकासाठी अमित देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. येथील अस्थीस्थळाच्या विकासासाठी आम्ही जिल्हाधिकारी महोदयांच्या माध्यमातून वारंवार बैठका घेऊन पाठपुरावा केला. डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांना व येथील नागरिकांना अपेक्षित विकास करण्यासाठी आम्ही यापुढेही पूर्ण प्रयत्न करू, असे धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# स्वागतार्ह निर्णय

फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक होईल. यावेळी स्वबळावर लढण्याची घोषणा काँग्रेसने केली आहे. तोच कित्ता आम आदमी पार्टीनेही गिरवला आहे. कागदावर मतांचे गणित करून हिशेब मांडणार्यांना काँग्रेस आणि आप या दोन्ही पक्षांचा निर्णय चुकीचा वाटू शकतो. त्यांच्या मतांची विभागणी होईल असा तर्क त्याकरता दिला जाऊ शकतो. पण कोणा एकाला संपूर्ण वर्चस्व बहाल करून दिल्लीचे भले होणार नाही आणि झालेही नाही. त्यामुळे ज्यांना उपलब्ध दोन सक्षम पर्याय नको असतील तर त्यांना जुना, अनुभवलेला पर्यायही उपलब्ध आहे व त्याचा ते वापर करू शकतात. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या या निर्णयाचे स्वागतच करायला हवे. स्वबळावर लढण्याचा निर्णय आत्मघातकी कसा हे स्पष्ट करण्यासाठी अलीकडेच झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीचे उदाहरण दिले जाते आहे. या राज्यातील ९० पैकी ४८ जागा जिंकून भारतीय जनता पार्टीने हॅट्रिक केली. काँग्रेसलाही ३७ जागा मिळाल्या. आम आदमी पार्टीला खाते उघडता आले नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना 'आप'शी आघाडी करायची होती. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांना मात्र स्वबळावर सत्ता काबीज करण्याचा विश्वास असल्यामुळे त्यांनी राहुल यांच्या इच्छेपुढे मान तुकवली नाही.

असेही नुकताच आलेला लोकसभेचा निकालही त्यांच्या पथ्यावर पडला. प्रचंड हवा निर्माण करूनही 'आप'ने हरियाणात एकच जागा जिंकली. विधानसभेत भाजपला ३९.९४ तर काँग्रेसला ३९.०९ टक्के मते मिळाली. आपला १.७९ टक्के मतदारांनी पसंती दिली. भाजप आणि काँग्रेसला मिळालेल्या मतांमध्ये अत्यंत सूक्ष्म अंतर आहे मात्र तरीही भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळेच दावा करणार्यांचे म्हणणे असे आहे की जर काँग्रेस आणि आप एकत्र लढले असते, तर काँग्रेस सत्तेत राहिली असती आणि भाजपची स्थिती बिकट झाली असती. हे गणित मांडणार्यांचा तर्क बिनतोड असला, तरी त्यात मतदारांना गृहीत धरण्याची जी सवय आहे तीही डोकावते. काँग्रेस आणि आप एकत्र आले असते तर कदाचित दोन्ही पक्षांना आता जी मते मिळाली आहेत तीही त्यांना मिळाली नसती आणि ती अन्य किंवा भाजपकडे गेली असती याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. निवडणूक रणनीतितज्ज्ञ प्रशांत किशोर यांनी बिहारसंदर्भात हाच तर्क मांडला आहे.

या राज्यात राष्ट्रीय जनता दल नको, पुन्हा जंगलराज नको म्हणून लोक राष्ट्रीय लोकशाही आघाडीला नाईलाजाने मतदान करत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ते अन्य कोणाच्या पचनी पडले असेल नसेल मात्र 'आप'च्या अरविंद केजरीवाल यांना समजले. सहा महिन्यांपूर्वी त्यांनी दिल्लीत काँग्रेससोबत लोकसभा एकत्रितपणे लढवली. दोन्ही पक्षांची मतांची बेरीज केली तर भाजपला ते सहज पराभूत करू शकले असते. प्रत्यक्षात त्यांना खातेही उघडता आले नाही. राजधानीतील सर्व ७ जागा भाजपने जिंकल्या. आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सोबत घेतले, तर काँग्रेसला मतदारांच्या असलेल्या विरोधाचा फटका आपल्याला बसू शकतो आणि त्यामुळे मते भाजपकडे जाऊ शकतात याची केजरीवालांना कल्पना असल्यामुळे इंडिया आघाडीत राहूनही पहिला दगड कोणी मारायचा याचा काँग्रेस आणि आप दोघेही वाट पाहात होते. केजरीवाल हिशेबी राजकारणी आहेत, त्यांचा फायदा त्यांनी बघितला.

तथापि, काँग्रेसने मात्र या संधीचा फायदा घेण्याची गरज आहे त्याचे कारण कोणी काहीही म्हटले तरी केजरीवालांचा दिल्लीत आणि एकूणच देशातील राजकारणात उदय हा काँग्रेसच्या मुळावरच झाला आहे. यासंदर्भातील आकडेवारी अगदी बोलकी आहे. २०१३ मध्ये काँग्रेसला दिल्ली विधानसभेत जवळपास २५ टक्के मते मिळाली. नंतर २०१५ मध्ये ९.७ तर २०२० मध्ये केवळ ४.३ टक्के मते मिळाली. यातील २०१३ मध्ये काँग्रेसला ८ जागा मिळाल्या आणि नंतरच्या दोन निवडणुकांत त्यांना खातेही उघडता आले नाही. कारण त्यांचा जनाधार संपुष्टात आला होता व यातील बहुतांश लोकांनी सक्षम पर्याय म्हणून 'आप'ला स्वीकारले आणि 'आप'ने विरोधक औषधालाही शिल्लक ठेवले नाही असे यश मिळवले. काँग्रेसने जे गमावले तेच 'आप'ने कमावले.

हाच प्रयोग त्यांनी हरियाणा, गुजरात, गोवा आणि पंजाबमध्येही केला. यातील प्रत्येक राज्यात काँग्रेसला फटका बसला आणि पंजाबचीही काँग्रेसच्या संदर्भात बोलायचे तर दिल्ली झाली. या राज्यातही २०२२ मध्ये आप स्पष्ट बहुमताने सत्तेवर आली. आम आदमी पार्टीशी हातमिळवणी ही चूक होती असे अलीकडेच दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी म्हटले आहे. तसेच चूक एकदाच होते, पुन्हा पुन्हा केली जात नाही असेही त्यांनी म्हटले आहे व यावेळी दिल्लीतील सगळ्या जागा लढण्याचा इरादा जाहीर केला. त्यांचे म्हणणे त्यांच्या श्रेष्ठींनी ऐकले आणि खरेच काँग्रेस स्वबळावर लढली तर ते काँग्रेससाठी आणि दिल्लीकरांसाठीही पोषक असणार आहे. सध्याच्या स्थितीत दिल्लीकरांनी लोकसभा भाजपला आणि विधानसभा 'आप'ला अशी विभागणी केली आहे.


तथापि, गेल्या दहा वर्षांतील अनुभव पाहता या दोन्ही पक्षांनी केवळ भांडणेच केली. केजरीवालांना भाजपने काम करू दिले नाही, असा 'आप'चा आरोप आहे, तर भाजपही केजरीवाल आणि कंपनीच्या विरोधात वेगवेगळी प्रकरणे काढून त्या पक्षाला तोडण्याचा प्रयत्न करतो आहे. अशा वातावरणात तिसरा सहमतीचे, सहअस्तित्वाचे राजकारण करणारा पक्ष उभा राहिला आणि तो स्वतंत्रपणे जाणार असला, तर मतदारांना ते हवेच असेल.

# बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली?.

निसर्गाचा नियम आहे जो जन्मा येतो.तो एक दिवस मृत्यू पावतो.निसर्ग नियमाने सर्वच प्राणी माणस जगतात,काही खाण्यासाठी जगतात तर काही जगण्यासाठी खातात.कोण किती दिवस जगला त्याला काही महत्व नाही.कसा जगला आणि काय केले, त्याला जगात खूप महत्व आहे.भारतात असा एकमेव व्यक्ती आहे जो केवळ एक पाव खाऊन व दोन गिलास पाणी पिऊन शिक्षण घेत होता.त्याच्या त्या परिश्रमाने त्यागाने त्याने आपले नांव अजरामर करून ठेवले तो जाऊन आज ६८ वर्ष झाले तरी त्याला देश विसरल्याला तयार नाही. असा एकमेव पुरुष नव्हे तर महापुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्याच्या मृत्यूला महापरिनिर्वाण दिन म्हणतात.तो बहुजन समाजा करिता दुखाचा दिवस आहे,असे म्हटल्या जाते.पण गेल्या काही वर्षा पासून महार, दलित,बौद्ध समाज व त्याच्या संस्था,संघटना,पक्ष महापरीनिर्वाण दिन आहे हे विसरले आहेत.महापरीनिर्वाण दिनाला जत्रेचे स्वरूप आले आहे.जत्रेतील गर्दी वर्ड रिकार्ड तोंडणारी आहे. पण राजकीय वैचारिक शक्ति त्यात दिसली नाही. लोकसभा विधानसभा निवडणूक संपल्या आमच्या संघटना पक्ष आणि समाज कुठेही दखल पात्र ठरला नाही.पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना सिंहा सारखे जगावे लागते.समोरून पहिले तर प्रत्येकांना त्याच्या नजरेत भय आणि आदर वाटला पाहिजे.आणि मागून पहिले तर तो अनेकांचे तिरस्काराचे बाण खाऊन रक्त बंबाळ झालेला असतो.ते आज पर्यत कोणीच मनावर घेतले नाही,त्यामुळे सामाजीक,शैक्षणिक,सांस्कृतिक ,धर्मिक, राजकीय संस्था,पक्ष संघटना एक नां धड भराभर चिंद्या झाल्या आहेत.क्रांतीकारी विचारधारा तोंडात असते आणि आचरणात लाचारी.यामुळेच पक्ष संघटना वाढत नाही.पक्ष,संघटना एकखांबी नेतृत्व झाल्या आहेत.त्यासाठी लोकशाहीच्या नांवावर लाचारी करणारे एकखांबी नेतृत्व निर्माण झाले आहे. गोरगरिबांना न्याय देणारी न्याय व्यवस्था राहिली नाही. गरीब कार्यकर्त्यांना लाथा,आणि श्रीमंत कार्यकर्त्यांना पायघड्या देणारे नेतृत्व जास्त काळ टिकत नाही. ते नेहमीच अस्तित्वासाठी तडजोड करीत असते. त्यात त्याचे कोणतेही नुकसान होत नाही. नुकसान हे समाजाचे व चळवळीचे होते.त्यावर चर्चा होत नाही.लोकसभा विधानसभा निवडणुकीत एड.प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची लक्षवेधी भूमिका ठरत होती.तिच्या बदल खोटा प्रचार करण्याचे काम सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक, संपादक,लेखक,सेवानिवृत अधिकारी,सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने करीत होती हे आपण सोशल मिडियावर वाचले व पाहिले असेलच.२३ नोव्हेंबर नंतर या सर्वांचा सर्व पातळीवरून कसा धुवा उडाला हे आपण पहिले आहे.म्हणून म्हणतो बघाना बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार समाजाने वाजोटे ठरविले आहेत. या देशातील विविध जाती धर्माचे प्रांताचे लोक भारतीय संविधानाने एकत्र राहू शकतात असे अनेक विचारवंत सांगतात.हे जर शंभर टक्के खरे आहे.तर आंबेडकरी समाज एकसंघ का राहू शकत नाही.ज्यांनी ज्यांनी संविधान स्वीकारले त्याचा स्वभिमान जागा झाला आहे.त्याचे कल्याण व विकास झाला आहे.त्यामुळेच विविध संस्था,संघटना,पक्ष निर्माण होतात त्यांनी संविधानाच्या चौकटीत काम केले तर त्या वाढतात.नाही केले तर संपतात.

बाबासाहेबाच्या समता सैनिक दलाच्या धर्तीवर राष्टीय स्वयंसेवक संघ (आर एस एस ) निर्माण झाली असे सांगितल्या जाते.त्याच्या हजारो वेगवेगळ्या संस्था संघटना असल्या तरी त्याचे सामाजिक,शौक्षणिक,राजकीय उधिस्ट एक असते.म्हणून ते किती हि वेगवेगळे असले तरी एक असतात.या उलट आंबेडकरी चळवळीचे झाले आहे.ते विचाराने कितीही एक असले तरी ते कधीच एक नसतात,मग तो अन्याय,अत्याचार, हत्याकांडाची रम ाबाई,खैरलांजी,सोनई,खडी,जवखेडा असो.ते वेगवेगळे लढणारच. मग सांगा यांना एक बाबासाहेब मान्य आहे काय?. त्याच बाबासाहेबांनी लिहलेली भारतीय राज्यघटना,संविधान यांना मान्य आहे काय?.जर हे मान्य असेल तर कोणत्याही कुटुंबाची दुर्दशा होणारच मग ते प्रकाश असो की आनंद, उद्धव असो कि




राज,तशी चळवळीची ही दुर्दशा होणारच कारण त्याला कोणतीही निमावली लागू नाही.

महापरिनिर्वाण दिन एकाच महापुरुषाचा देशात मानला जातो. देशात अनेक सम्राट हृदय सम्राट झाले.त्याचा स्मृर्तीदिन कधी आला आणि गेला तो कोणाला कळत सुद्धा नाही. पण डॉ.बाबसाहेब आंबेडकर असे महामानव आहेत त्याच्या स्मृतीदिनाची जगात दखल घेतल्या जाते. त्याच्या त्या महापरीनिर्वाण दिनाला काही लोक मोठ्या प्रमाणात गालबोट लावण्याचा प्रयत्न करतात. कोण आहेत ते ?.शिवाजी पार्क आणि परिसरात खेळणे,कपडे विकू नये असे सांगितल्या जाते. तरी मोठ्या प्रमाणात दुकाने का लागतात. मग दुकानदार कोण व खरीददार कोण?.कॅसेट सीडी चा मोठा आवाज करून गोंगाट करू नका असे पोलीस विनती करून सांगतात.तरी त्यांना न जुमानता आवाज करणारे कोण?.संविधानाच्या कलमानुसार पोलिसांनी कारवाई केली. तर काय होईल?.यावर चळवळीच्या नेत्याचे नियंत्रण आहे काय?.काय करते महापरीनिर्वाण समन्यव समिती ?.चैत्यभूमी विकास समिती ?.हे काही करू शकणार नाही.कारण यांना संविधानच मान्य नाही. काही कार्यकर्त्याची,नेत्याची वर्षभराची कमाई (एक ते आठ डिसेंबरमध्ये) या मधून होते असे अनेक अधिकारी खासगीत सांगतात.त्यामुळे महापरीनिर्वाण दिनाला हिणकस वळण लागताना दिसत आहे.त्याला एक नेता,एक संघटना,एक पक्ष जबाबदार नाही.त्याला जबाबदार आहे आंबेडकरी चळवळ आणि समाज जबाबदार आहे त्यामुळे आंबेडकरी चळवळीची दुर्दशा झाली. चळवळीची दुर्दशा होण्यासाठी काही कॉम्रेड नी हातभार लावला असे म्हणणे चूक ठरणार नाही.इतर समाजाला महापरीनिर्वाण दिवसाचा खूप त्रास होतो,त्यांना एवढी गर्दी पाहून धडकी भरते ते माणस आहेत हेच काही लोकांना मान्य नाही त्याच्या अंगावरील कपड्याचा घाण वास येतो ते परिसारत घाण करतात.असे अनेक आरोप लावल्या जातात. हेच आरोप लावणारे इतर समाजाच्या नऊ / दहा दिवस चालणाऱ्या धांगडधिंगाला मोठया उत्सवाने स्वीकारतात.त्याचा वाहतूक,ध्वनी प्रदूषण,त्याच्या कडून घाण होत नाही का?. त्याची तुलना महापरीनिर्वाण दिनाशी होत नाही. आंबेडकरी चळवळ संघटना पक्षा बाबत त्यांना विचारले तर जे सत्य सांगणार नाहीत माहित असून त्यांना या बाबत विचारणे म्हणजे आंबेडकरी चळवळीत असंतोष पसरविणे नाही काय ?.

बाबसाहेब च्या वेळी जिवाला जिव देणारे सहकारी आंबेडकरी चळवळीत होते अनेक समस्या वर अभ्यासपूर्ण माहिती घेवुन ते संघटना पक्ष चालवत होते.आजचे कार्यकर्ते नेते वाट पाहतात कधी कुठे पुतळ्याची विटंबना होते कुठे आमच्या आया बहिणीची इज्जत लुटली जाते कुठे अन्याय अत्याचार आणि हत्याकंड घडते आणि आम्ही मोर्च्या आंदोलन करून तोडपानी करतो त्याचे भांडवल करून आमच्या नांवाची पार्टी बनवितो.काही घडलेच नाही तर आम्ही गप्प बसणार नाही पुतल्याची स्वछता करून सुशोभीकरण करा.नाही तर आम्ही आमरण उपोषण करतो. या रेल्वे स्टेशनला हे नांव द्या नाही तर ते करतो अशी ही चळवळ बाबासाहेबाची होती काय ?.महापरी निर्वाण दिनी जन आंदोलन करून नेते बनू पाहणारे खरेच आंबेडकर वादी असू शकतात काय ?.याच्या घरी यांचा माय बाप मेले असते. त्या दिवसी यांनी असे आंदोलन केले असते?.याच दिवसी जेलभरो करून,सामुहिक आत्मदहन करणारे आंबेडकरी विचार आणि चळवळ पुढे नेणारे असू शकतात?.यांनी कोणी केली ही चळवळीची दुर्दशा?.माझ्या तमाम जागृत समाज बांधवा नो हिच वेळ आहे आपल्या बाबाच्या महापरीनिर्वाण दिनाच्या दिवशी आत्मचिंतन करण्याची आता किती वेळ सांगणार इतिहास वाचल्या वर इतिहास घडविता येतो. येणारी पीढी आपला ५० वर्षाचा इतिहास वाचेल.तेव्हा सांगा त्याना नामांतर साठी किती वर्ष लढ़लो आणि नामविस्तर करून समाधान पावलो.पुतला विटंबना झाल्या मुले रमाबाई हत्याकांड घडले.मनोहर कदम चे काय झाले.खैरलांजी, सोनाई,खर्डा,जवखेडा हत्याकंडाचा इतिहास लिहावा लागेल ते पुढील पिढी वाचेल नंतर बाबासाहेबाचा इतिहास वाचेल. तेव्हा ते विचारतील सांगना बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली. बाबासाहेबाना विनम्र अभिवादन करताना हा प्रश्न प्रत्येकानी स्वताला विचारवा हेच खरे विनम्र अभिवादन असेल.

*******

सागर रामभाऊ तायडे-
९९२०४०३८५९
,भांडुप,मुंबई.

# एक स्वप्नच ठरू नये: विमानाने उड्डान

हा जगभरातील वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग झाला आहे. आज ७ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन आहे. एका शहरातून दुसऱ्या शहरात किंवा एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यासाठी हवाई प्रवास हा एक वेगवान आणि आरामदायी मार्ग आहे. मात्र आजही जगभरातील अनेक गरीब देश किंवा विकसनशील देशांतील अनेकांसाठी हवाई प्रवास हे एक स्वप्नच आहे. अर्थात देशातील अनेक छोट्या शहरांना हवाई प्रवासासाठी जोडण्यासाठी उडान योजना राबवण्यात येत आहे. जगभरातील सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी नागरी उड्डाणाचे महत्त्व अधोरेखित करत सन २०१३पासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. अर्थातच जरी ७ डिसेंबर २०१३ आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन पहिल्यांदा साजरा करण्यात आला असला तरी याचे इतिहासाशी जुने नाते आहे. श्री एन.कृष्णकुमार जी. गुरूजींचा माहितीपूर्ण लेख आपल्या सेवेत... संपादक.

हवाई प्रवासाच्या क्षेत्रात सुरक्षा आणि सावधगिरी यांना चालना देण्यासाठी या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संघटना किंवा संस्थांमध्ये अधिक जागरुकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाचे महत्त्व आहे. जगभरातील मानकांसाठी आयसीएसओ ही हवाई प्रवासातील सुरक्षेसाठीच्या आंतरराष्ट्रीय मानकांसाठी काम करते आणि ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाचाच एक भाग आहे. ७ डिसेंबरलाच आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन साजरा केला जाण्यामागे १९४४मध्ये शिकागोमध्ये याच दिवशी इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन करारावर सह्या होणे हे आहे. नागरी उड्डाण प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि एकजिनसीपणा साधण्यासाठी ७ डिसेंबर १९४४ला इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशनची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाणाचे सामाजिक आणि आर्थिक विकासातील महत्त्व यासंदर्भात जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशन अनेक जागतिक संघटनांसोबत मिळून काम करते. यामध्ये जागतिक मोसम विभाग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना, युनिव्हर्सल पोस्टल युनियन, जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्रसंघ इत्यादींचा समावेश आहे. देशातील अधिकाधिक भागात हवाई सेवा पोहोचावी यासाठी केंद्रातील मोदी सरकारने उड्डान योजना आणली. या योजनेअंतर्गत हवाई सेवा लहान शहरांमध्ये सुरू करण्यात येत आहे. या दिशेने एक पाऊल पुढे जात सरकारने नवीन विमानतळ, हेलिपॅड आणि नवीन हवाई मार्ग सुरु करण्याची घोषणा केली आहे. मोदी सरकारची ही नवी विमान वाहतूक सुधारणा आहे. योजनेनुसार ५ विमानतळ गुजरातमधील केशोद, झारखंडमधील देवघर, महाराष्ट्रातील गोंदिया आणि सिंधुदुर्ग याशिवाय उत्तर प्रदेशातील कुशीनगरमध्ये बांधले जातील. हिमाचल प्रदेशातील शिमला, मनाली, मंडी आणि बद्दी याशिवाय उत्तराखंडमधील हल्दवानी आणि अल्मोडा येथे हेलिपॅड बांधले जातील.

आईसीएओच्या ५०व्या वर्धापन दिनानिमित्त सन १९९४मध्ये आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाची सुरूवात करण्यात आली. सन १९९६मध्ये त्याच्या पुढाकारानंतर आणि कॅनडाच्या सरकारच्या मदतीने, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अधिकृतपणे या दिवसाला संयुक्त राष्ट्र प्रणालीमध्ये आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन म्हणून मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाचे उद्दिष्ट राज्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाणाच्या महत्त्वाविषयी जगभरात जागरुकता निर्माण करणे आणि त्यांना बळकट करणे तसेच खरोखर जागतिक जलद पारगमनामध्ये योगदान देणे आणि राज्यांना मदत करण्यात आईसीएओची अनोखी भूमिका आहे, याची जाणीव करून देणे हे आहे. युनायटेड नेशन्स आणि जगातील राष्ट्रे आता अजेंडा २०३० स्वीकारत असून, जागतिक शाश्वत विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करत असताना, जागतिक कनेक्टिव्हिटीचे इंजिन म्हणून विमानचालनाचे महत्त्व शिकागो शिखर परिषदेच्या उद्दिष्टांशी कधीही जास्त सुसंगत नव्हते. आंतरराष्ट्रीय उड्डाण म्हणून पाहिले जाते.

विमान वाहतुकीबद्दल काही आश्चर्यकारक तथ्ये जी तुम्हाला कदाचित माहीत नसतील. १) जगातील सर्वात जुनी एअरलाइन म्हणजे रॉयल डच एअरलाइन्स आहे. त्याची स्थापना सन १९१९मध्ये झाली आणि त्याचे पहिले उड्डाण १७ मे १९२० रोजी एमस्टरडॅम आणि लंडन दरम्यान झाले. २) भारतातील सर्वात जुनी एअरलाइन टाटा एअरलाइन्स आहे, जी सन १९३२मध्ये जेआरडी.टाटा यांनी स्थापन केली आणि सन १९४६मध्ये एअर इंडिया बनली. ३) पायलट आणि सह-वैमानिक समान अन्न खात नाहीत, कारण जर एखाद्याला अन्नातून विषबाधा झाली तर दुसरा विमान उडवू शकतो. ४) सन १९८७मध्ये अमेरिकन एअरलाइन्सने त्यांच्या प्रथम श्रेणीतील ग्राहकांच्या सॅलडमधून १ ऑलिव्ह काढून ४०,००० वाचवले. ५) सन २०१५मध्ये जगातील नागरी विमान वाहतूक ताफ्यात २७,३५२ विमाने होती. ६) जगातील विमान कंपन्यांनी सन २०१५मध्ये एकूण ४.१ ट्रिलियन प्रवासी-मैलांसाठी ३.५ अब्ज लोकांची वाहतूक केली. ७) पहिले नियोजित व्यावसायिक विमान उड्डाण १ जानेवारी १९१४ रोजी फ्लोरिडा बे ते सेंट पीटर्सबर्ग ते टॅंपा येथे झाले. ८) सरासरी फक्त २५ टक्के ग्राहक फर्स्ट क्लाससाठी पूर्ण भाडे देतात, तर बाकीचे दैनंदिन फ्लायर्स, एअरलाइन कर्मचारी किंवा अपग्रेडर असतात. ९) सरासरी, व्यावसायिक उड्डाणाचा वेग ८०० किमी/तास असतो. १०) विमानातील ऑक्सिजन मास्क सुमारे १५ मिनिटे ऑक्सिजन ठेवू शकतात.

दि.७ डिसेंबर १९४४रोजी शिकागोमध्ये आंतरराष्ट्रीय नागरी हवाई परिषद झाली होती. त्यानंतर सन १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने या दिवशी आंतरराष्ट्रीय नागरी हवाई दिवस साजरा करण्याची घोषणा केली. हवाई सेवांमध्ये सुधारणा, संरक्षण, मार्गांची निश्चिती, परिवहन आदी व्यवस्थेत आणखी सुधारणा करणे, हा या दिवसाचा उद्देश होता. त्यामुळे जगभरातील विमानतळांवरील कर्मचारी, व्यवस्थापन आणि हवाई वाहतूक नियंत्रण- एटीसी साठीदेखील हा दिवस महत्त्वाचा असतो. या दिवशी आणखी एक महत्त्वाची घटना घडली होती. क्वांटस एअरलाइन्सच्या विमानातील वैमानिक आणि क्रू सदस्यांनी शर्थीचे प्रयत्न करून ४४९ प्रवाशांचे प्राण वाचवले होते.

जगातील सर्वात उंच चार एटीसी टॉवर्स आशियात- थायलंड, मलेशिया, जपान, चीन हे असून तीन अमेरिकेत आहेत. रॉयल डच ही सर्वात पहिली एअरलाइन असून १९१९ मध्ये तिची सुरुवात झाली होती. दि.१७ मे १९२० रोजी या एअरलाइनच्या पहिल्या विमानाने एम्स्टर्डमहून लंडनच्या दिशेने प्रयाण केले होते. त्यानंतर क्वांटस (१९२०) एअरलाइन सुरू झाली. बोइंग ७४७-४०० एसच्या कॉकपिट विंडो फ्रेमचा खर्च एका लक्झरी कारच्या खर्चाएवढा आहे. त्याची वायरिंग २८० किमी लांबीची असते. अलास्का एअरलाइनने सर्वप्रथम १९९९मध्ये ऑनलाइन चेक इन सेवा सुरू केली. विमानाचा वैमानिक आणि सहवैमानिकाला वेगवेगळे भोजन दिले जाते. विषबाधा झाल्यास यापैकी एक जण तरी विमान सांभाळू शकेल, हे यामागील कारण. चीनमधील काम्दो-बांग्दा येथील धावपट्टी जगात सर्वात लांब (५.५ किमी) असून ती तिबेट क्षेत्रात येते. त्यानंतर रशिया व फ्रान्सचा क्रमांक लागतो. १ जानेवारी १९१४ रोजी अमेरिकेत पहिल्या व्यावसायिक प्रवासी विमानाचे उड्डाण फ्लोरिडा बेपासून टेंपा येथील सेंट पीटर्सबर्गकडे झाले होते. २०१५मध्ये जगातील सहाव्या सर्वात व्यग्र विमानतळाचा मान लंडनमधील हिथ्रो विमानतळाला मिळाला. त्यापूर्वी टोकियो, शिकागो, दुबई, बीजिंग आणि अटलांटाचा क्रमांक लागला. लंडनहून पॅरिसकडे जाणाऱ्या विमानात १९१९मध्ये सर्वप्रथम नाष्ट्यासाठी रोख घेतली गेली. एअर पोर्ट हा शब्द पूर्वी १७८०मध्ये जहाज व्हेंटिलेशनसाठी तयार केलेल्या जागेसाठी किंवा छिद्रासाठी वापरला जात असे. सन १९०२मध्ये हा शब्द सर्वप्रथम विमानांसंदर्भात वापरला गेला, हे विशेष! !! जागतिक नागरी हवाई दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*********

संकलन -
श्री एन.कृष्णकुमार जी. गुरूजी.
गडचिरोली, फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.

# दिव्यांग क्रीडा स्पर्धांमध्ये सुमारे ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग दिव्यांग बांधवांच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन – मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर






लातूर :– दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, सांस्कृतिक स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आपले कला, क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज येथे व्यक्त केला. बाभळगाव पोलीस मुख्यालय मैदान येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी श्री. सागर बोलत होते.

समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, समाज कल्याण अधिकारी विलास केंद्रे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजाने यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आजपर्यंत विविध पातळीवर आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून सुवर्ण, रौप्य व कास्यपदकांची कमाई केली आहे. त्यांनी केलेली कामगिरी अतिशय कौतुकास्पद आहे. या विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांचा विकास करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा पातळीवर होणारी क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरणार आहे. शासन, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात दिव्यांग बांधवांसाठी अतिशय चांगले उपक्रम राबविले जात आहेत. या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे श्री. सागर म्हणाले.

लातूर जिल्ह्यातील ५१ शाळांमधील जवळपास ६०० दिव्यांग विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. दिव्यांगत्व प्रकारानुसार आणि वयोगटानुसार ९२ विविध गटात स्पर्धा होणार असल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी प्रास्ताविकात सांगितले.

प्रारंभी स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्साही वातावरणात पथसंचलन केले. त्यानंतर क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. तसेच महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यासोबतच भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देवून उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड यांनी केले.

# वैशाली बुद्ध विहारात महापरिनिर्वाणदिनी बौद्ध उपासक उपासिकांकडून अभिवादन




लातूर – वैशाली बुद्ध विहार बौद्ध नगर लातूर येथे महापरिनिर्वाण दिनी परिसरातील बौद्ध उपासक उपासिकांकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादन करताना केशव कांबळे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम विद्या संपादन केली त्यामुळे चांगले आणि वाईट अधोगती व प्रगती यातील फरक त्यांनी ओळखला म्हणून त्यांनी मनुष्यमात्राला अधोगतीस नेणाऱ्या देव व देवतास नकार देत २२ प्रतिज्ञाद्वारा विज्ञानवादी विचार आपल्या भल्यासाठी दिला. म्हणून आपण अंधश्रद्धेचा त्याग करून प्रज्ञा अर्थात शहाणपणाचा पंचशील विचार आचरणात आणणे हेच खरे अभिवादन आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

या वेळी दामू कोरडे, सूर्यभान लातूरकर , लातूरकर, अशोकराव सातपुते, भरत कांबळे, एच .एन गायकवाड ,जगन्नाथ सुरवसे ,धनराज कांबळे, उत्तम गायकवाड, दत्ता लोखंडे, गौतम चिकाटे, रवी सोनवते ,शारदा सातपुते, लता कांबळे ,शारदा सातपुते, अंबुबाई घनगावे, मीना सुरवसे, सुमन कांबळे ,चिकाटेताई ,कमलाबाई कांबळे, पिंकी चिकाटे, पदमीनबाई अडसुळे, अनुराधा कांबळे, सह परिसरातील जनसमुदाय मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होता. यानंतर उपासक उपासिकांनी धम्म रॅली काढून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## जवाहेरुल उलूम उर्दू हायस्कूलमधील विद्यार्थीनीस किनवट तालुक्यातील पहिल्या अपार कार्डचे वाटप

किनवट/शेख शौकत :–येथील जवाहेरुल उलूम उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील आदिना मरयम मोहम्मद अतीक या विद्यार्थिनीस केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांचे हस्ते 'वन नेशन, वन स्टुडन्ट कार्ड', या भारत सरकारच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत तालुक्यातील पहिल्या अपार आयडी कार्डचे वाटप करण्यात आले.

भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती आणि यशाचा मागोवा घेणे या उद्देशाने ' एक राष्ट्र , एक विद्यार्थी कार्ड , ' या प्रणाली अंतर्गत अपार आयडी ( ऑटोमॅटिक परमनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री ) हा बारा अंकी कायमस्वरूपी ओळख क्रमांक देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला दिल्या जात आहे. विद्यार्थ्यांचे व पालकांचे आधार कार्ड घेऊन युडायस पोर्टलवरून हे कार्ड जनरेट करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, योजना शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे यांच्या नेतृत्वा व गट शिक्षणाधिकारी गंगाधर राठोड यांच्या संयोजनात तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक अपार आयडी जनरेट करण्याचे काम मिशन मोडवर करीत आहेत.

या अनुषंगाने परिक्षेत्र : किनवट–एकचे शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी मोकळे व नयाकॅम्प, किनवट केंद्राचे केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांनी सर्व व्यवस्थापनाच्या , सर्व प्रकारच्या व सर्व माध्यमाच्या शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्य यांची सहविचार सभा महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय गोकुंदा येथे घेऊन आपार आयडी जनरेट करण्याविषयी पीपीटी प्रेझेंटेशन द्वारे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामुळेच सर्वच मुख्याध्यापक प्राधान्याने हे कार्य करीत आहेत.

२६ नोव्हेंबर रोजी जवाहेरूल उलूम उर्दू शाळेतील एकूण ८७३ विद्यार्थ्यांपैकी फक्त १७ विद्यार्थ्यांची माहिती भरण्यात आली होती. केंद्र प्रमुखांनी त्यांना योग्य मार्गदर्शन केल्याने तसेच डाटा एन्ट्री ऑपरेटर शेख युनूस यांचेकडून सर्व त्रुटींची पूर्तता करून घेतल्याने आज रोजी ८० टक्के पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे अपार आयडी जनरेट झाले आहेत. त्यातीलच आदिना मरयम मोहम्मद अतीक या विद्यार्थिनीस तालुक्यातील पहिलं अपार आयडी कार्ड केंद्रप्रमुख उत्तम कानिंदे यांचे हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अस्मा खातून अब्दूल गफार, इशरत देशमुख व मोहम्मद अतीक यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हे कार्ड म्हणजे शिक्षण माहिती पत्रच आहे. डॉ. सविता बिरगे , शिक्षणाधिकारी (प्रा ) , जि.प. नांदेड नवीन शैक्षणिक धोरणातील हे कार्ड डिजी लॉकर सारखे एडूलॉकर असेल . –माधव सलगर , शिक्षणाधिकारी (प्रा ) , जि.प. नांदेड विद्यार्थ्याला कोणती शिष्यवृत्ती मिळते, कोणत्या शैक्षणिक योजनांचा लाभ मिळतो , याचा लेखाजोखाच हे कार्ड असेल . –दिलीपकुमार बनसोडे, शिक्षणाधिकारी (यो ) , जि.प. नांदेड विद्यार्थ्याने कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतले त्याला कोणती बक्षीसं , प्रमाणपत्र मिळाले , हे कार्डवर असेल . गंगाधर राठोड ,गट शिक्षणाधिकारी , पं.स . , किनवट विद्यार्थ्यांचा १२ अंकी कायमस्वरूपी ओळख क्रमांक असेल , शाळा बदलली तरीही माहिती जतन असेल . बालाजी मोकळे , शिक्षण विस्तार अधिकारी , परिक्षेत्र : किनवट –१विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा निपुणता याचा आलेखच हे कार्ड असेल . –उत्तम कानिंदे , केंद्र प्रमुख , नयाकॅम्प , किनवट

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन व सामुहिक बुध्द वंदना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन




अहमदपूर / प्रतिनिधी :– भारतरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुध्दवंदना आणि अभिवादन कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीच्या वतीने करण्यात आले. सुरुवातीला भारतीय बौध्द महासभा तालूका शाखेच्या वतीने सामूहिक त्रीशरण पंचशिल घेण्यात आले.त्यानंतर मान्यवरांची अभिवादन पर मनोगते संपन्न झाली. या प्रसंगी उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगारकर, पँथरचे नेते संजयभाऊ कांबळे,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे, वाय.डी. वाघमारे,माजी नगरसेवक शेषेराव ससाणे, डॉ.आे.एल.किनगांवकर, अण्णाराव सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते दयानंद वाघमारे, डॉ.पांडूरंग टोंम्पे, कुलदीप हाके,चंद्रकांत कांबळे, बाबासाहेब लेंडेगावकर,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष रामानंद मुंडे, माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे, बालाजी थिट्टे,मेघराज गायकवाड, उत्तम लोखंडे, प्राचार्य एम.बी.वाघमारे,राजेंद्र पाटील, शिवनाथ कांबळे, प्रदिप कांबळे,आशाताई कांबळे,राणी गायकवाड,उज्वलाताई बनसोडे,पत्रकार गणेश मुंडे,दिलीप कांबळे,रासू वाघमारे,बी. जी.दुगाणे, गायकवाड,डी.जी.गायकवाड,राहुल तलवार,आदींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.बालाजी आचार्य यांनी केले.तर या कार्यक्रमाचे आभार संयोजक तथा पुतळा समीतीचे सचिव डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी मानले. तर संजयभाऊ कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरूणभाऊ वाघंबर,सचिन बानाटे, अजय भालेराव, शिवाजीराव भालेराव,आकाश पवार, संविधान कदम, रितेश रायभोळे,शरद कांबळे, आदित्य ससाणे,सुमीत ससाणे, दिलीप भालेराव,शिवाजी भालेराव, हिरामण धसवाडीकर, रमेश ससाणे, सुवर्णकेत कांबळे, मिलींद कदम, दिनेश तिगोटे, अजिंक्य गायकवाड,आदींनी पुढाकार घेतला. या प्रसंगी विविध पक्षाचे सामाजिक, राजकिय नेते कार्यकर्ते,महिला भगीनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# रस्त्याचे वाजवले तीन तेरा, गुणवत्ता तपासून कारवाई करावी राष्ट्रीय महामार्गाचा झाला पांदण रस्ता; अपघाताची शक्यता

> केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी माहूर गडावरील रेणुका माता मंदिरावर जाण्यासाठी मंजूर केलेल्या लिफ्ट आणि स्काय वाक या कामाच्या उद्घाटनासाठी माहूरला आले असता त्यांनी धनोडा येथून गेलेल्या नागपूर तुळजापूर या राष्ट्रीय महामागार्ला धनोडा ते कोठारी पर्यंत वाढीव महामार्गास मंजुरी देऊन कोट्यावधीचा निधी दिला परंतु कंत्राटदार तसेच राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याकडे दुर्लक्ष करून थातूरमातूर रस्ता बनवत किनवट माहूर तालुक्यातील. शहरातील रस्त्यालगच्या नाल्या आणि पेव्हर ब्लॉक चे काम अर्धवट सोडून पथदिवे उभारून त्यास कनेक्शन न देताच रस्त्यावर अंधार पसरवून पोबारा केल्याने शहरात येणारे भाविक नागरिक त्रस्त झाले आहेत राष्ट्रीय महामार्गाचा पांदण झाला रस्ता झाला असुन अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे. महामार्गाचे तीन तेरा वाजवले असुन गुणवत्ता तपासुन कारवाई करावि असी मागणी जनत्यातून होत आहे.



किनवट/शेख शौकत :–मालवाडा घाटात एकेरी रस्ता बनवून अर्धवट सोडल्याने त्या रस्त्याच्या बाजूला काटेरी झुडपे वाढली असून रस्त्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघात होत असून माहूर ते सारखणी पर्यंतच्या रस्त्यावरील अनेक गावातील नागरिकांनी रस्त्यावर उकिरडे पलाटीचे फास इतर साहित्य टाकून अतिक्रमण केले असून अनेक गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उघड्यावर शौचास बसत असल्याने राष्ट्रीय महामार्गाचा पांदन रस्ता झाल्याचा भास वाहनधारकांना होत आहे. नवनिर्वाचित खासदार नागेश पाटील आष्टीकर आमदार भीमराव केराम यांचे सह कंत्राटदार शारदा कंट्रक्शन आणि राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांना हजारो नागरिकांनी याविषयी तोंडी लेखी तक्रारी सादर केल्या अनेक वर्तमानपत्रात बातम्या ही प्रसिद्ध झाल्या परंतु अद्याप यावर कोणीही ब्र शब्द काढला नसल्याने कंत्राटदार आणि प्राधिकरणाकडून रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली नसून घाटात अनेक ठिकाणी रस्ता वेडा वाकडा बनविल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असून शहरातील नाल्यांची कामे अर्धवट राहिल्याने पावसाचे तथा सांडपाणी रस्त्यावर येत असून अनेक ठिकाणी पेव्हर ब्लॉकचे काम अर्ध्यावर सोडण्यात आले. त्या ठिकाणी गिट्टी टाकल्याने ती गिट्टी रस्त्यावर येऊन वाहनाच्या टायर मध्ये अडकून उडत नागरिकांना लागून अपघात होत आहेत तसेच टी पॉइंट ते ग्रामीण रुग्णालयापर्यंत रस्त्याच्या मधोमध सात फुटाचा डिव्हायडर असताना दोन फुटाचा डीवाईडर करून त्यात विद्युत खांब उभे करण्यात आले असून त्याला कनेक्शन दिले नसल्याने गेल्या वर्षभरापासून विद्युत खांब आणि लाईट जंगत आहेत त्यामुळे रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य असल्याने पायी जाणाऱ्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना सर्प विंचू चावण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. माहूर शहरासह तालुक्यातून गेलेल्या राष्ट्रीय महामागार्ला लागून अंतर्गत रस्ते वनविले नसल्याने अनेक अपघात होऊन नागरिकांचा वाहन धारकांचा जीव गेला असून याकडे साफ दुर्लक्ष करण्यात येत आहे मालवाडा घाटात साफसफाई करून दुसऱ्या बाजूने तात्पुरता मुरूमाचा भराव तरी टाकावा तसेच या ठिकाणी झालेल्या एकेरी रस्त्याच्या खालून पाण्याचा पाझर फुटला असून त्याची गुणवत्ता तपासणी करावी अनेक गावाला लागून गेलेल्या रस्त्यावर झालेले अतिक्रमण करत रस्त्यावर टाकलेले साहित्य उचलून रस्ता मोकळा करावा अनेक गावाला लागून गेलेल्या रस्त्यावर उघड्यावर – शौचास बसून हागणदरी बनवून ठेवल्याने या ठिकाणी नागरिकांनी उघड्यावर शौचास – बसू नये यासाठी उपाय योजना करत माहूर – शहरातील पथदिवे तात्काळ चालू करावे खासदार आमदाराकडून ही कामे होत नसल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी वटहुकूम – जारी करत सदरील कामे तात्काळ मार्गी – लावावी अशी मागणी गडावर दर्शनासाठी – येणाऱ्या भाविक वाहनधारकातून होत आहे.

# उमंग सेंटर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिननिम्मित अभिवादन





लातूर :- ६ डिसेंबर विश्वरत्न, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर यांचा ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टीडिसेबिलिटी रिसर्च सेंटर येथे महामानवास अभिवादन करण्यात आले. त्याप्रसंगी उमंगचे सचिव किरण उटगे, उमंगचे व्यवस्थापक ड.श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव डॉ.श्रीशैलम तलारी, डॉ.वैभव उटगे, डॉ.प्रतिक केंद्रे, डॉ.आंचल बांते, डॉ.अर्जुन राठोड, श्री.गणेश डोंगरे, किरण कांबळे, डॉ.शिवानी पाटील, डॉ.प्रविण राठोड, डॉ.भक्ती गोजमगुंडे, डॉ. सनोबर तांबोळी, माणिक करमले, अर्पणा बेंबळगे, विवेक हनवते, सचिन कौळखेरे, हरीष पोतले, रवी मठपती, बब्रवान काकनाळे, आणि उमंग येथील पालक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्रैमासिक बुद्धयान अंकाचे मोफत वाटप

बीड / प्रतिनिधी :- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि ६ डिसेंबर २०२४ रोजी बीड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या बंधू भगिनींना त्रिरत्न बौद्ध महासंघ या जागतिक बौद्ध चळवळीचे त्रैमासिक बुद्धयान डॉ बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती या अंकाचे मोफत वाटप धम्मचारी विरतकुमार लातूर यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने बंधू भगिनी उपस्थित होते




# बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना

मुंबई :- माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क देणाऱ्या व प्रजासत्ताक भारत देशाला संविधान देणाऱ्या, महिला, आबालवृद्ध, शोषित, पीडित, वंचित, मागास, गोरगरीब नागरिकांना मूलभूत हक्क व अधिकार मिळवून देणाऱ्या महामानव, विश्ववंदनिय, ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बौद्धजन पंचायत समितीचे सन्मानिय सभापती मा. आनंदराज आंबेडकर यांच्या अधिपत्याखाली समितीचे संपूर्ण व्यवस्थापक मंडळ, महिला मंडळ, कार्यकारिणी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दादर चैत्यभूमी येथे सकाळी ठीक ९:०० वाजता बाबासाहेब आंबेडकरांना साश्रू नयनाने मानवंदना देण्यात आली. सदर मानवंदना दिल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे समितीचे उपसभापती मा. विनोद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले, सदर प्रसंगी उपसभापती विनोद मोरे व कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या शुभहस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पसुमने अर्पण करण्यात आली व सरचिटणीस राजेश घाडगे यांनी ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरवात केली. तद्नंतर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश भा. पवार गुरुजी व मनोहर बा. मोरे गुरुजींनी सुमधुर वाणीने धार्मिक पूजा संपन्न केली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस राजेश घाडगे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, बौद्धाचार्या साक्षी मोरे, मध्यवर्ती महिला मंडळाच्या उपाध्यक्षा प्रमिला मर्चंडे, विवाह मंडळाचे चिटणीस अतुल साळवी, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनी बाबासाहेबांच्या जीवन चरित्रावर मौलिक विचार मांडीत शेवटच्या श्वासापर्यंत बाबासाहेबांनी कशाप्रकारे लढाऊ व जिद्दीवृत्तीने कामकाज केले, पोटाची चार मुले मातीआड करीत शोषितांच्या न्यायहक्कांसाठी मनुवाद्यांना कसे पुरून उरले, शिक्षण व पुस्तकांवर असलेले त्यांचे प्रेम या संदर्भातील जुन्या आठवणींना उजाळा दिला त्यामुळं उपस्थितांना बाबासाहेबांच्या आठवणी ताज्या झाल्या व त्यांच्या महान उपकारांची जाण झाल्याने आपसूकच सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले. उपसभापती विनोद मोरे हे आपले विचार व्यक्त करीत असताना म्हणाले की बाबासाहेबांचे जीवन हे नेहमीच संघर्षमय राहिले त्यांनी मोठ्या पराकाष्ठेने अनंत अडचणींचा सामना करत संविधान समितीत स्थान मिळवत कोणाचीही मदत न घेता एकहाती



संविधान लिहिले, अनेक संकटांना झेलत वंचित, मागास, अस्पृश्य, गरीब, उपेक्षितांसाठी आपला लढा कायम ठेवला म्हणूनच आज देशातील अनेक मान्यवर नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या कधी येतात व जातात हे कळत देखील नाही परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एकमेव असे नेते आहेत ज्यांची जयंती १४ एप्रिलला सुरू होऊन जूनपर्यंत चालते व त्यांच्या महापरिनिर्वाण दिनाला अथांग असा जनसागर चैत्यभूमीला लोटतो, अश्या महान महामानवाचे आपण अनुयायी आहोत म्हणून त्यांच्या विचारांचे पालन केले पाहिजे व आदर्शव्रत जीवन जगले पाहिजे, आज लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत येथे आपले एकही उमेदवार नाही ही परिस्थिती ही आपण बदलली पाहिजे समितीच्या माध्यमातून जनजागृती करीत सर्वांनी एकसंघ होऊन बाबासाहेबांच्या विचारांची ज्योत तेवत ठेवली पाहिजे असा ही संदेश दिला. सदर कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, खजिनदार नागसेन गमरे, चिटणीस लवेश तांबे, यशवंत कदम, रवींद्र शिंदे, अरुण जाधव, संस्कार समिती अध्यक्ष मंगेश पवार, मनोहर बा. मोरे, महिला मंडळाच्या साक्षी मोरे, प्रमिला मर्चंडे, विलास जाधव, गटक्रमांक १३ चे गटप्रतिनिधी राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, माजी गटप्रमुख प्रकाश कासे, गजानन तांबे, निवडणूक मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जाधव आदी मान्यवर, विभागीय शाखा प्रतिनिधी, सभासद, कार्यकर्ते सदर अभिवादन सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी सरचिटणीस राजेश घाडगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त धम्म उपासक, प्रचारक अभ्यासक सागर रामभाऊ तायडे यांच्या घरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना सागर तायडे, चंद्रकला सागर तायडे, नातु अर्हत विनोद चव्हाण,अर्णित विनोद चव्हाण.

# बार्टी पुस्तक स्टॉलवर पुस्तके खरेदी करण्यासाठी भीमसागर उसळला नागरिकाकडून संविधान प्रतीला मोठी मागणी

मुंबई : -- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर येथे अभिवादन करण्यासाठी देशातील विविध राज्यातुन लाखो भीम अनुयायांनी येत असतात . डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने शिवाजी पार्क मैदानावर भीम अनुयायांसाठी ८५% सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महामानवाचे पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती.

महापरिनिर्वाण दिनी बार्टी पुस्तक स्टॉलचे उद्घघाटन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव श्री विजय वाघमारे यांच्या हस्ते अनुयायांना पुस्तकांचा संच भेट देऊन करण्यात आला.





उद्योग विभागाचे सचिव श्री हर्षदीप कांबळे तसेच जीएसटीचे आयुक्त श्री निखिल मेश्राम यांच्या हस्ते अनुयायांना भोजन पॅकेटचे वाटप करण्यात आले. विधान परिषदेचे आमदार श्री अमोल मिटकरी यांनी सुध्दा पुस्तक स्टॉलला भेट देऊन पुस्तके खरेदी केली. याप्रसंगी बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, श्री उमेश सोनवणे, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, सुमेध थोरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

भीम अनुयायांनी बार्टी पुस्तक स्टॉलवरून पुस्तकांची विक्रमी खरेदी केली. अनुयायांनी बार्टीची पुस्तके खरेदी करण्यासाठी आज सकाळपासूनच रांगेत उभे होते. संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्यामुळे संविधान, उद्देशिका , डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड व ईतर महापुरुषांच्या पुस्तकांची खरेदी करण्यासाठी अनुयायांची लगबग दिसून आली . विद्यार्थी , महिला आंबेडकरी चळवतील कार्यकर्ते इतिहास संशोधक , अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पुस्तकांची खरेदी केली.

बार्टीच्या विविध योजनांचा लाभ अनुयायांना होण्यासाठी माहिती पुस्तिका विनामूल्य देण्यात आल्या. अनुयायांना बार्टी तर्फे सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री विजय वाघमारे आणि बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टीच्या टीमने नियोजन केले. गेल्या तीन दिवसांपासून बार्टीचे अधिकारी व कर्मचारी मुंबई उपनगरचे समतादुत मेहनत घेत आहेत.

# ग्रामीण शब्दकोश समितीच्या सदस्यपदी कवी ॲड.हाशम पटेल यांची नियुक्ती

लातूर,दि.६ः साहित्यिक ऍड.हाशम इस्माईल पटेल यांची ग्रामीण शब्दकोश समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली असून,त्यासंदर्भातले पत्र मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी नुकतेच पाठविले आहे.



या पत्रात ठाले पाटील यांनी म्हटले आहे की, मराठवाडा प्रदेश मराठी भाषेचे उगमस्थान असून, या प्रदेशातील मराठी भाषा ही मुळ व मध्यवर्ती भाषा आहे. कालपरत्वे तिची रुपे बदलत गेली. आजची मराठी आणि पूर्वीची मराठी भाषा यात आज बरेच अंतर निर्माण झाले आहे, ते होतच असते. मराठीची मुळ नानाविध शब्दरुपे आजही ग्रामीण भागातील लोकजीवनात आढळताना दिसतात. परंतु ग्रामीण बोली भाषेतील हे जुने अनेक शब्द काळानुरुप लोप पावत आहेत. ते पुढील पिढ्यांसाठी जतन व संवर्धन करण्यासाठी ग्रामीण बोलीतल शब्दांचा आजच्या अर्थासहीत एक शब्दकोश तयार करावा असे मराठवाडा साहित्य परिषदेने ठरविले आहे. अशा पध्दतीने भाषेचे व भाषा शिक्षणाचे काम करणार्यास संस्थांनी जाणीवपूर्वक व ठरवून कार्य केले,त्यासाठी वेळ दिला तरच मराठी भाषेचे हे शब्दसंचित जतन होऊ शकेल. साहित्य परिषदेच्या दृष्टिने भाषेचे हे काम महत्वाचे असल्याने त्यासाठी ग्रामीण शब्दकोश समितीची निर्मिती करण्यात आली आहे.हा प्रकल्प शब्दकोष समितीच्या मदतीने पूर्ण करावा यासाठी ग्रामीण शब्दकोश समितीचे सदस्य म्हणून ऍड.हाशम पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आपण आपल्या समाजाता आपापसात बोलल्या जाणार्या शब्दा शब्दांवर नजर ठेवावी आणि त्यांची नोंद करत जावी, त्याचा शब्दकोशात समावेश करण्यात येईल,असेही त्यात नमुद केले आहे.ऍड.पटेल यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचे साहित्य क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# देवेन्द्रजी २१०० रुपये जमा करा

पुणे : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर काल १२ दिवसांनी सरकार स्थापन झाले. ५ डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानात महायुती सरकारचा शपथविधी झाला. महायुतीमध्ये भाजप मोठा भाऊ ठरल्यामुळे मुख्यमंत्रीपद त्यांच्याकडे गेले. आता खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की देवेंद्रजी म्हणाले होते की, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून २१०० रुपये देणार आहोत. नवीन वर्ष सुरु होत आहे. डिसेंबर किंवा जानेवारी, डिसेंबर महिना सुरु झाला आहे पण शक्य असेल, तर डिसेंबरपासूनच किंवा १ जानेवारी २०२५ पासून लाडक्या बहिणीच्या खात्यात महिना २१०० रुपये जमा करा. आम्ही तर म्हणतो ३ हजार रुपये द्या, कारण आम्ही सत्तेवर आलो असतो, तर महिना ३ हजार रुपये देणार होतो असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. विधानसभा निवडणुकीत भाजपचे १३२ आमदार निवडून आले. त्यामुळे मुख्यमंत्रीपद भाजपला मिळाले. देवेंद्र फडणवीस यांनी काल महाराष्ट्र राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तशी देवेंद्र फडणवीस यांची शपथ घेण्याची तिसरी वेळ आहे. २०१४ ते २०१९ पहिला कार्यकाळ होता. २०१९ साली फक्त ८० तास हा त्यांचा दुसरा कार्यकाळ राहिला. आता ५ डिसेंबरपासून त्यांचा तिसरा कार्यकाळ सुरु झाला आहे. त्यांच्यासोबत शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

सरकार स्थापन झाल्यानंतर ही योजना सुरु राहिल का? असा अनेकांच्या मनात प्रश्न आहे. महायुतीच्या नेत्यांनी या योजना सुरु राहतील असे वारंवार सांगितले आहे. महायुतीने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातून महिन्याला १५०० ऐवजी २१०० रुपये जमा करण्याच आश्वासन दिले आहे.

# माफसु येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

नागपूर :- दि. ०६ डिसेंबर रोजी कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) तर्फे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते भारतरत्न परमपुज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती तैलचित्राला पुष्पहार घालून व संचालनालय, विस्तार शिक्षण, शेतकरी भवन, तेलंखेडी येथील प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.



या प्रसंगी डॉ. शिरीष उपाध्ये (संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशु विज्ञान), डॉ. नितीन कुरकुरे (संचालक संशोधन), डॉ. अनिल भिकाने (संचालक विस्तार शिक्षण), डॉ. सचिन बोन्डे (अधिष्ठाता निम्न शिक्षण), डॉ. मुकुंद आमले (अधिष्ठाता मत्स्य विज्ञान), श्रीमती. मोना ठाकूर (कुलसचिव), श्रीमती. मनीषा शेंडे (नियंत्रक वित्त), श्री. अरिफ शेख (विद्यापीठ अभियंता), श्री. सुनील गावंडे (विद्यापीठ ग्रंथपाल), डॉ. भूषण रामटेके (परीक्षा नियंत्रक), डॉ. अजय गावंडे (उपकुलसचिव आस्थापना), डॉ. जितेंद्र वाघाये (उपकुलसचिव शिक्षण), तांत्रिक अधिकारी डॉ. अतुल ढोक, डॉ. संजय गोडबोले, डॉ. सारीपुत्त लांडगे, डॉ. विजय बासुनाथे, डॉ. प्रज्ञेय ताकसांडे, तांत्रिक अधिकारी व अध्यक्ष, कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटना (नागपूर शाखा), डॉ. गीतांजली ढुमे, श्री. प्रवीण बागडे, उपाध्यक्ष, कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) व मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE